# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** धरमपेठ झोन क्र. ०२ अंतर्गत प्रभाग क्र. १३ येथे मौजा हजारीपहाड
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** (गुंठेवारी ले-आऊट) पावसाळी नालीचे बांधकाम करणे या कामाची मूळ प्राकलनीय रक्कम रु. ३३,५५,२६१/- एवढी आहे. सदर्हु कामास पद क्र. A४२००१३७४६१२ अंतर्गत आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ मध्ये रु. ३३,५५,२६१/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदर्हु प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. सदर्हु कामास मा. मुख्य अभियंता यांच्या व्दारे तांत्रिक मान्यता क्र. SE/PWD/T.S/०१/२०२४-२५ दि. २२/०५/२०२४ नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
२. सदर्हु कामाचा खर्च पद क्र. A४२००१३७४६१२ अंतर्गत प्रस्तावित आहे.
३. या कामाकरिता रितसर ऑनलाईन ई - निविदा मागविण्यात येईल.
४. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 860/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 15/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. ०२ अंतर्गत प्रभाग क्र. १३ येथे मौजा हजारीपहाड (गुंठेवारी ले-आऊट) पावसाळी नालीचे बांधकाम करणे या कामाची मूळ प्राकलनीय रक्कम रु. ३३,५५,२६१/- एवढी आहे. सदर्हु कामास पद क्र. A४२००१३७४६१२ अंतर्गत आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ मध्ये रु. ३३,५५,२६१/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदर्हु प्राकलनाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.